N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन रामटेक जिल्हा नागपूर (ग्रामीण) सत्यमेव जयते

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नागपुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** रामटेक

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0238 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/05/2023 16:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 7
**Date From (दिनांक पासून):** 04/05/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 04/05/2023
**Time From (वेळेपासून):** 21:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/05/2023 **Time (वेळ):** 11:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 011

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/05/2023 11:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नागपुर ते मनसर रोड वरील , कांद्री RTO आउट चेक पोष्ठ,प्रादेशीक परिवहन कार्यालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विकास राजेंद्र केदार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1999

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राजेवाडी पोष्ट महाळंगी,चाकोर,किनगांव,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राजेवाडी पोष्ट महाळंगी,चाकोर,किनगांव,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गीता भास्कर शेजवळ | | | 1. कांद्री चेक पोष्ट प्राप कार्या, रामटेक ,रामटेक,नागपुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | मुकुंद सोनकुसरे | | | 1. अज्ञात,अज्ञात |
| 3 | राजेश भातखोरे | | | 1. अज्ञात ,अज्ञात |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

अ.क.ब्युरो, यवतमाळ कॅम्प:- रामटेक दिनांक:- 05/05/2023 फिर्याद
मी विकास राजेंद्र केदार, वय 24 वर्ष, व्यवसाय ट्रक ड्रायव्हर रा. ग्राम राजेवाडी पोस्ट महाळंगी ता. चाकोट जिल्हा लातुर, नमुद पत्यावर माझे कुटुंबासह राहतो. कांद्री बॉर्डर चेक पोस्ट वरील श्रीमती. गीता शेजवळ मॅडम व श्री. अतुल भागवत साहेब व त्यांचे खाजगी व्यक्ती हे मला कांद्री बॉर्डर चेक पोस्ट पास करणे करिता मला 500/- रुपये एन्ट्री च्या नावाने लाचेची मागणी केल्याने, मी त्यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार दिनांक 04/05/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ येउन पोलीस उपअधीक्षक श्री.शैलेश प्र सपकाळ यांचे समक्ष लेखी तक्रार दिली, ती खालील प्रमाणे आहे.
तक्रार यवतमाळ दि. 04/05/2023 प्रति, पोलीस उपअधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ. अर्जदार:- विकास राजेंद्र केदार, रा. राजेवाडी ता. चाकोट जि. लातुर, मो.नं. 7758884822 विषय:- प्रादेशीक परिवहन कार्यालय कांद्री बॉर्डर चेक पोस्ट जि. नागपुर येथील गीता शेजवळ मॅडम व अतुल भागवत साहेब व त्यांचे खाजगी व्यक्ती हे कांद्री बॉर्डर चेक पोस्ट नागपुर पास करणे करिता मला 500/- रुपये एन्ट्री म्हणुन लाचेची मागणी करित असल्याने त्यांचेवर कार्यवाही करणेबाबत.
महोदय,
मी वरील ठिकाणी राहत असुन माझे षिक्षण 12 पर्यंत झाले आहे. माझे कडे मोठे ट्रक चालविणेकरिता आवश्यक असणारे हेव्ही ट्रान्सपोर्ट लायसन्स क्रमांक क्र.2420160001723 असुन मी श्री. अबीद अली रा. शिवणी मध्यप्रदेश यांचे कडे असलेल्या ट्रकवर ड्रायव्हर म्हणुन मागील 1 वर्षापासुन काम करीत आहो. मी श्री. अबीद अली यांचे मालकीचा टाटा कंपनीचा 12 टायर चा ट्रक क्रमांक CG-07-CJ-2708 हा चालवितो. या ट्रक व्दारे मी नेहमी शिवनी मध्यप्रदेश ते मुंबई, मंबई ते शिवनी मध्यप्रदेष अशी मालवाहतुक करित असतो. मी शिवनी वरुन ट्रक घेवुन निघाल्यावर महाराष्ट्र व मध्य प्रदेशच्या बॉर्डरवर प्रादेशीक परिवहन कार्यालय नागपुर अंतर्गत कांद्री बॉर्डर चेक पोस्ट आहे. या चेक पोस्टवर गीता शेजवळ मॅडम व अतुल भागवत साहेब हे डयुटीवर नेहमी असतात. त्यांनी काही खाजगी व्यक्ती हे ट्रक थांबविणे, वसुली करिता ठेवले आहे. मी माझे ट्रक ने शिवनी ते मुंबई, मुंबई ते शिवनी अशी वाहतुक करतांना गीता शेजवळ मॅडम व अतुल भागवत साहेब व त्यांचे खाजगी लोक हे नेहमी मला गाडी पास करण्यासाठी एन्ट्रीच्या पैशाकरिता नेहमी अडवणुक करतात व गाडीचे कागदपत्र बरोबर असुन सुध्दा 500/-रुपये एन्ट्री च्या नावाने मागतात व 500/- रुपये घेतल्यावर कोणतीही शासकीय पावती देत नाही. यापुर्वी सुध्दा त्यांनी मला ट्रक पास करण्यासाठी प्रत्येकी वेळी एन्ट्रीचे 500/- रु. मागीतल्याने मला नाईलाजाने ते द्यावे लागले. मी दोन दिवसापुर्वी मुंबई येथुन शिवनी येथे वरील ट्रक घेवुन समुध्दी हायवे ने निघालो व आज दि. 04/05/2023 रोजी अंदाजे रात्री 08.00 ते 10.00 वा. दरम्यान परिवहन कार्यालय नागपुर यांचे कांद्री बॉर्डर चेक पोस्ट पास करणार आहे. त्यावेळी कांद्री बॉर्डर आऊट चेक पोस्ट वर गीता शेजवळ मॅडम किंवा अतुल भागवत साहेब हे डयुटीवर असतात व त्यांचे खाजगी इसम त्यांचे सोबत असतात. कांद्री बॉर्डर आऊट चेक पोस्टवर त्यावेळी गीता शेजवळ मॅडम किंवा अतुल भागवत साहेब यापैकी जे कोणी हजर असतील ते व त्यांचे खाजगी इसम हे मला कांद्री बॉर्डर चेक पोस्ट पास करणे करिता 500/- रुपये एन्ट्री च्या नावाने लाचेची मागणी करतील. माझी व त्यांची दुश्मनी नसुन पैशाचे देवाण घेवाणचा व्यवहार आमचे मध्ये नाही. तेव्हा त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी." अशी तक्रार दिली.
यानंतर दिनांक 04/05/2023 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री.सपकाळ यांनी माझे तक्रारीची पडताळणी करणेकरीता उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय यवतमाळ येथुन पंच क्र.1) श्री. विजय गणपतराव सुरोशे, भुमापक व पंच क्र.2) श्री. सुहास मनोहरराव भगत, भुमापक हे दोन शासकीय पंच बोलाविण्यात आले. पोलीस उपअधीक्षक

श्री.सपकाळ यांनी दोन्ही पंचाना माझी व मला पंचाची ओळख करुन दिली. त्यांना मी तोंडी तकार सांगीतली माझी लेखी तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. पडताळणी कार्यवाही दरम्यान होणारे संभाषण हे व्हाँईस रेकाँर्डरव्दारे सॅनडिस्क कंपनीचे 32 जी.बी.मेमरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगीतले. तसेच व्हाँईस रेकाँर्डरचे प्रात्यक्षीक सुध्दा करून दाखविण्यात आले. सविस्तर कारवाई दिनांक 04/05/2023 रोजीचे पडताळणीपुर्व पंचनामा प्रमाणे करण्यात आली.

माझे विनंतीवरुन तक्रारीची पडताळणी दिनांक 04/05/2023 रोजी करण्याचे ठरल्याने आवष्यक साहित्यासह पोलीस उपअधीक्षक श्री.सपकाळ हे स्वतः, पंच, पथकातील कर्मचारी असे शासकीय वाहनाने मी नागपुर ते मनसर रोडवरील न्युहायवे स्टार धाब्या जवळ जावुन थांबलो. यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.सपकाळ, पथकातील कर्मचारी, पंच क्र.2 असे शासकीय वाहनाने व मी, पंच क्र.1) सुरोषे, पो.ना.भोयर असे माझे ट्रक क्रमांक CG-07-CJ-2708 ने कांद्री चेक पोस्ट कडे जवळ जाउन थांबलो, यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.सपकाळ यांचे सुचनेवरुन पो.ना.भोयर यांनी व्हाँईस रेकाँर्डर सुरु करुन माझे गळयात शर्टाचे आतमध्ये लेसव्दारे लटकवीला, ती वेळ 21/24 वाजताची होती. मी, पंच क्र.1 यांचेसह माझे ट्रकने कांद्री आर.टी.ओ चेकपोस्ट येथे भेटण्याकरीता गेलो व तेथे आउट चेक पोस्टचे कार्यालयामध्ये मी श्री. मुकुंद सोनकुसरे, (खाजगी ईसम) व श्री. राजेश भातखोरे, (खाजगी ईसम) यांची भेट घेतली व त्यांचेशी कांद्री चेक पोस्ट वरून ट्रक पास करण्यासंबधाने बोललो, त्यावेळी श्रीमती. गीता शेजवळ यांची डयुटी मनेसर ते नागपुर रोडवरील आउट चेकपोस्टवर दुपारी 02.00 ते रात्री 10.00 वा. पर्यंत प्रभारी अधिकारी म्हणुन डयुटी होती. त्यांनी त्यांचे डयुटी दरम्यान अनाधिकृतपणे मुकुंद सोनकुसरे आणि राजेष भातकोरे या खाजगी ईसमांना त्या कर्तव्यावर हजर असलेल्या कांद्री बाँर्डर चेकपोस्टवरील परिवहन कार्यालय (आउट) या शासकिय ईमारतीचे कक्षामध्ये त्यांना सुविधा पुरवुन ट्रक चालकाकडुन लाचेची रक्कम जमा करणे करीता नेमले होते. कांद्री चेकपोस्ट वरुन माझे नेहमी जाणेयेणे असल्याने या दोन्ही इसमांना मी ओळखतो मी त्यांना भेटलो त्यावेळी तेथे दोन्ही खाजगी ईसम श्रीमती गीता शेजवळ यांचे शासकिय कर्तव्याचे पाळीमध्ये श्रीमती गीता शेजवळ यांचेकरीता ट्रक चालकांकडुन एंट्रीचे नावाखाली लाचेची रक्कम जमा करीत होते. मी त्यांना भेटलो त्यावेळी त्यांनी मला 400/- रुपये लाचेची मागणी केली. यानंतर मी, पंच क्र.1 असे पथका जवळ परत आलो असता पो.ना. भोयर यांनी माझे जवळील व्हाईस रेकाँर्डर घेउन बंद केला, ती वेळ 21/35 वाजताची होती. यानंतर पंच पडताळणी पथक व मी व्हाईस रेकाँर्डर मधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत संभाषण ऐले. त्यामध्ये ट्रकच्या एंन्ट्रीच्या नावाखाली वरील दोन्ही इसमांनी लाचेची मागणी केल्याचे संभाषण होते पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री.मुकुंद सोनकुसरे, (खाजगी ईसम) व श्री. राजेश भातखोरे, (खाजगी ईसम) यांना ट्रकचे CG-07-CJ-2708 या क्रमांकावर संशय आल्याने त्यांनी मला "गाडी पाच मिनीटात काड लवकर निगुन जा" असे म्हटले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री. सपकाळ यांनी पथकासह कांद्री चेक पोस्ट येथे जाउन श्रीमती. गीता शेजवळ, मोटार वाहन निरीक्षक तसेच त्यांचे सोबतचे व्यक्ती श्री. मुकुंद सोनकुसरे, (खाजगी ईसम) व श्री. राजेश भातखोरे, (खाजगी ईसम) यांचा शोध घेतला असता ते परिवहन कार्यालयात मिळुन आल्या नाही, परिवहन कार्यालयातील श्रीमती. गीता शेजवळ, मोटार वाहन निरीक्षक यांचे रुमची झडती घेतली असता तेथे त्यांचा शासकीय गणवेश, पर्स, व पैसे इत्यादी साहीत्य टेबलवर सोडुन निघुन गेल्याचे दिसले. पोलीस उपअधीक्षक श्री.सपकाळ यांनी व्हाँईस रेकाँर्डर मधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत संभाषणाची ट्रान्सक्रिप्ट माझे मदतीने तयार केली. सविस्तर कारवाई दिनांक 04/05/2023 रोजीचे पडताळणी पंचनामा प्रमाणे करण्यात आली.

एकंदरीत कारवाई दरम्यान सिमा तपासणी नाका कांद्री जि. नागपूर या चेकपोस्टवर आउट साईड परिवहन कार्यालय येथील प्रभारी अधिकारी गीता षेजवळ, मोटार वाहन निरीक्षक यांनी त्यांचे शासकिय कर्तव्याचेवेळी अनाधिकृतरित्या दोन खाजगी ईसमांची नेमणुक केली. त्याचे परिणामस्वरूप सदर दोन खाजगी ईसमांनी माझा ट्रक कांद्री बाँर्डर चेक पोस्ट (आउट) पास करणे करिता तडजोडीअंती श्रीमती गीता शेजवळ मॅडम यांचेकरीता 400/-रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले आहे. श्रीमती गीता शेजवळ यांनी माझेकडुन ट्रक एंट्रीचे नावाखाली लाचेची मागणी करण्यास त्यांनी नेमलेल्या खाजगी ईसमांना प्रत्यक्ष सहकार्य करून लाच मागणी करण्यास प्रोत्साहन दिले आहे.

त्यावरुन आ.लो.से.क्र.1) गीता भास्कर शेजवळ, वय 40 वर्ष, पद मोटार वाहन निरीक्षक नेमणुक क्रांद्री चेक पोस्ट प्रादेषिक परिवहन कार्यालय नागपुर ग्रामीण जिल्हा नागपुर, आरोपी क्र.2) मुकुंद सोनकुसरे, (खाजगी ईसम), आरोपी क्र.3) राजेष भातखोरे, (खाजगी ईसम) यांचेविरूध्द कायदेशीर कारवाईस्तव तक्रार देत आहे.

सही
विकास राजेंद्र केदार

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Hridaynarayan Satyadev Yadav(I (Inspector)) / POBN61353

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

340

स्टे. डा. अमलदार
पोलीस ठाणे, रामटेक

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Hridaynarayan Saty
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN61353